International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# PESA कायदा व आदिवासी समाजाची स्वशासन व्यवस्था

**डॉ. केदार लक्ष्मण काळवणे[1], भारत आसाराम बल्हाळ[2]**

[1]*सहाय्यक प्राध्यापक मराठी विभाग*

*शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब, जि. धाराशिव (उस्मानाबाद).*

[2]*संशोधक विद्यार्थी, मराठी, रिसर्च सेंटर:- बलभीम महाविद्यालय बीड.*

***Corresponding Author – डॉ. केदार लक्ष्मण काळवणे***

**DOI - 10.5281/zenodo.17656330**

## 1. PESA कायद्याची पार्श्वभूमी:

भारतीय संविधानाच्या पाचव्या अनुसूचीनुसार अनुसूचित क्षेत्रांतील प्रशासन आणि व्यवस्थापनासाठी विशेष तरतुदी आहेत. सन 1992 मध्ये पंचायतीराज कायदा लागू झाला, पण त्यात अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक गरजा आणि परंपरा विचारात घेतल्या नव्हत्या. आदिवासी क्षेत्रांमध्ये स्थानिक स्वायत्ततेला अधिकृत स्वरूप देण्यासाठी पेसा कायदा 1996 साली आणण्यात आला. पेसा कायद्याला घेऊन लोकांमध्ये अनेक समज-गैरसमज पसरलेले आपल्याला जाणवतात. काहींना तो नौकरी साठी असलेला कायदा वाटतो, काहींना फक्त तो आदिवासी साठीच बनलेला आहे असे वाटते, काहींना तो अध्यादेश, प्रकल्प किंवा सरकारी योजना वाटतो, काही त्याला विकासात अडचण समजतात. पेसा कायद्याला घेऊन विविध मतभेदाच्या या वातावरणात हा कायदा मुळात समजून घेणे गरजेच आहे जेणे करून त्या बद्दल योग्य ते बरे-वाईट मत बनवायला आपल्याला मदत होईल. ७३ व्या घटना दुरुस्ती नंतर पंचायत राज व्यवस्थेची कायदेशीर सुरुवात झाली. अनुसूचित क्षेत्रात गट ग्रामपंचायत रचना व असलेला भौगोलिक विस्तार यामुळे ग्रामसभांना योग्य ते महत्व दिल्या जात नव्हते, विकास कामे प्रभावित होत होती. पाचव्या अनुसूचित क्षेत्रातील स्थानिक ग्रामसभांना विशेष अधिकार राहावेत म्हणून मागणी जोर धरीत होती. ह्याच मागणीला अनुसरून केंद्रात एच. डी. देवेगौडा हे पंतप्रधान असताना २४ डिसेंबर १९९६ ला पंचायत उपबंध (अनुसुचित क्षेत्रात विस्तार) अधिनियम, १९९६ [ज्याला इंग्रजी मध्ये The Provision of The Panchayats (Extension to Scheduled Areas) Act, 1996 असे म्हणत्तात] पारित करण्यात आला. या कायद्याच्या इंग्रजी नावच लघुरूप म्हणजे“PESA” जो सामन्यामध्ये “पेसा कायदा” नावाने प्रचलित आहे.

पेसा कायदा १९९६ चे मुख्य सूत्र आहे “अनुसूचित क्षेत्राच्या संस्कृती, प्रथा-परंपरा यांचे जतन, संवर्धन व ग्रामसभेच्या माध्यमातून स्वशासन व्यवस्था मजबूत करणे”. पेसा कायद्यांतर्गत अनुसूचित क्षेत्रामधील ग्रामसभांचे विशेष अधिकार मान्य करण्यात आले. ते विशेष अधिकार म्हणजे त्या ग्रामसभेला गौण वन उपजांवार अधिकार, गौण खनिजांवर अधिकार, बाजाराचे व्यवस्थापन, सावकारीचे नियंत्रण, जमिनीच्या विनिमयावर नियंत्रण, स्थानिक विकासाचे नियोजन

करण्याचे अधिकार मान्य करण्यात आले. स्थानिक संस्कृती,परंपरा आणि व्यवस्थेस मान्यता व रक्षण करण्याचे अधिकार ग्रामसभेला प्राप्त झाले. सदर कायद्याच्या मदतीने संसाधांवरील मालकी व व्यवस्थापनातून येणाऱ्या उत्पन्नावर ग्रामसभेची मालकी स्थापित झाली. ग्रामसभेची मालकी म्हणजे त्या गावात वास्तव्यात असलेल्या सगळ्या लोकांची/ समुदायाची मालकी. आदिवासी-आदिवासियेत्तर असा फरक पेसा कायदा करीत नाही. आणि महत्वाचे म्हणजे पेसा कायद्यात नौकरी व नौकर भारती संदर्भात काहीही तरतूद केल्या गेलेली नाही. तो नौकर भरतीचा नाही तर पंचायतीचा व स्वशासानाचा कायदा आहे. दरम्यान ज्या नौकरी भरती संदर्भातील अधिसूचनेला घेऊन प्रश्न निर्माण होत आहेत त्याचा पेसा कायद्यासोबत संबंध जोडून पेसा विरोधी वातावरण निर्माण केल्या गेले त्या अधिसुचानांना जाणून घेऊ या.

**अनुसूचित क्षेत्रातील नौकर भरती संदर्भातील अधिसूचना (९ जुन २०१४, १४ ऑगस्ट २०१४, ३१ ऑक्टोबर २०१४) व ५ मार्च २०१५ शासन निर्णय**:

भारतीय राज्य घटने मध्ये कलम २४४(१) मध्ये पाचव्या अनुसूचित क्षेत्राबद्दल तरतुदी केल्या आहेत. घटनेच्या ५ व्या अनुसूचित राज्यपालांना आदिवासी क्षेत्रांकरीता विशेष उपाययोजना करण्याचे अधिकार आहेत. महाराष्ट्राचे राज्यपाल महोदयांनी त्यांना भारतीय राज्य घटनेच्या पाचव्या सूचीतीलपरिच्छेद ५ मधील उप परिच्छेद १ नुसार प्रदान केलेल्याअधिकारानुसार, व १९८५ च्या महाराष्ट्र अनुसूचित क्षेत्र आदेश, याच्या अधीन अनुसूचित क्षेत्रातील अनुसूचित जमाती करिता स्थानिक नौकरी भरतीमध्ये विशेष तरतुदी निर्देशित केल्या.

९ जुन २०१४ च्या अधिसूचने नुसार अनुसूचित क्षेत्रामधील सरळसेवेने भरण्यात येणारी १) तलाठी, २)सर्वेक्षक, ३) ग्रामसेवक, ४) अंगणवाडी पर्यवेक्षक, ५) शिक्षक, ६) आदिवासी विकास निरीक्षक, ७) कृषि सहाय्यक, ८)पशुधन विकास पर्यवेक्षक, ९) परिचारिका, व १०) बहुद्देशीयआरोग्य कर्मचारी व नंतर १४ ऑगस्ट २०१४ च्या अधिसूचने नुसार ११) वन रक्षक, ३१ ऑक्टोबर २०१४ च्या अधिसूचने नुसार १२) कोतवाल अशी ग्रामस्तरावरील एकूण १२ संवर्गातील रिक्त असलेली पदे स्थानिक अनुसूचित जमाती मधील उमेदवारांमधूनच भरण्याचे आदेश दिलेले आहेत. सदर अधिसूचना गडचिरोली जिल्ह्यातील सन १९८५ च्या आदेशानुसार निवळ केलेल्या १३११ अनुसिचीत गावांकरिता लागू होतात.

उपरोक्त १२ संवर्गात अनुसूचित क्षेत्राबाहेर अनुसूचितजमातीसाठी फक्त ७ टक्केच आरक्षण ५ मार्च २०१५k च्याशासन निर्णयान्वये लागू करण्यात आले आहे. तसेच इतर प्रवर्गांच्या आरक्षणाची टक्केवारी महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम २००१ मधीलकलम ४ (२) प्रमाणे लागू करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

सदर नौकरी भरती संदर्भातील अधिसुचनांचे सखोल अभ्यास केल्यास हेच लक्षात येते के सदर अधिसूचना व पेसा कायद्याचा आपसात काहीही संबंध नाही. आणि सदर अधिसूचना या पेसा कायद्यानुसार काढलेल्या नाहीत. सदर अधिसूचना राज्यपालांना संविधानाच्या ५व्या अनुसूचित दिलेल्या अधिकारांचा वापर करून त्यांनी काढलेली आहे व ती १९८५ च्या आदेशाने घोषित केलेल्या अनुसूचित क्षेत्रांना लागू होते. म्हणजे त्या अधिसूचने चा खरा आधार संविधानातील

तरतुदी व १९८५ चा महाराष्ट्र अनुसूचित क्षेत्र आदेश हा आहे. त्यामुळे सदर अधिसूचने ला पेसा कायद्याशी जोडून पेसा कायद्याचा विरोध करणे म्हणजे आपण गैरसमजांना बळी पडणे होय.

दुसरी बाब म्हणजे, सदर अधिसूचना हि आपल्या जिल्ह्याच्या बहुतांश भागांना लागू होत आहे. त्यामुळे इथले अगोदरपासून चे रहवासी असलेल्या आदिवासीयेत्तर उमेदवारांना वरील अधिसूचनेत नमूद संवर्गात पद भरतीची संधी कमी झाली. हि बाब इथल्या स्थानिक बेरोजगार उमेदवाराच्या हिताची नाही. म्हणून सदर अधिसुचनांवर चर्चा होऊन संशोधन, बदल करण्याचे प्रयत्न होऊ शकतात. ह्यावर सविस्तर चर्चा समोर केलेली आहे.

## 2. PESA कायद्याची निर्मिती:

संविधानाच्या 73व्या घटनादुरुस्तीमुळे पंचायतीराज प्रणाली लागू झाली. पण अनुसूचित क्षेत्रांतील स्थानिक गरजा विचारात घेण्यासाठी संसदेला हा कायदा तयार करावा लागला आणि त्यानंतर 24 डिसेंबर 1996 रोजी हा कायदा अस्तित्वात आला.

## 3. PESA कायदा आणण्याचे उद्दिष्ट्ये :

अ) आदिवासींच्या पारंपरिक स्वशासन पद्धतींना मान्यता देणे.

ब) आदिवासींच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक अधिकारांचे रक्षण करणे.

क) खनिज संपत्ती, जमीन आणि जंगल यांवरील स्थानिक हक्क सुनिश्चित करणे.

ड) गावसभेला अधिक अधिकार देऊन स्थानिक स्वायत्तता मजबूत करणे.

## PESA कायद्याचे महत्त्वाचे फायदे:

अ) आदिवासी समुदायांना स्वायत्तता आणि सशक्तीकरण करणे.

आ) त्यांचे परंपरागत ज्ञान आणि संसाधने जपून ठेवणे.

इ) बाह्य शोषण आणि विस्थापन थांबवणे.

ई) पर्यावरणीय स्थिरतेस प्रोत्साहन देणे .

## PESA कायदा करताना आलेल्या अडचणी:

अ) अंमलबजावणीतील त्रुटी: अनेक राज्यांमध्ये पेसा कायद्याची योग्य अंमलबजावणी झाली नाही.

आ) राजकीय हस्तक्षेप: गावसभांच्या निर्णयांवर राजकीय हस्तक्षेप होतो.

इ) जागरूकतेचा अभाव: आदिवासी समाजातील अनेकांना त्यांच्या हक्कांची पूर्ण माहिती नाही.

## PESA कायदा करताना आलेल्या अडचणी सोडवण्यासाठी उपाययोजना:

अ) आदिवासी समुदायांत जागरूकता कार्यक्रम राबवणे.

आ) पेसा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मजबूत धोरणे आखणे.

इ) गावसभांच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी प्रशिक्षण आणि संसाधनांचा पुरवठा करणे.

## PESA ACT (पेसा कायदा):

हा कायदा आदिवासींसाठी विकास आणि सशक्तीकरणाचे एक महत्त्वाचे साधन आहे. तो आपल्या परंपरा, संस्कृती, आणि संसाधनांच्या संरक्षणासाठी प्रभावी आहे. जर या कायद्याची योग्य अंमलबजावणी केली गेली, तर आदिवासींचा सर्वांगीण विकास निश्चित

आहे. पेसा कायदा हा भारतीय आदिवासींच्या विकासासाठी आणि त्यांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. जर याची अंमलबजावणी प्रभावीपणे केली गेली,तर तो आदिवासी समाजाच्या सामाजिक, आर्थिक, आणि सांस्कृतिक विकासासाठी खूप उपयुक्त ठरू शकतो.

**आदिवासी समाजाची स्वशासन व्यवस्था:-**

**1. गावसभेचे अधिकार:**

पेसा कायद्यामुळे गावसभेला महत्त्वाचे अधिकार मिळाले. उदाहरणार्थ: जमीन विक्री किंवा भाडेतत्त्वावर देण्याचा अधिकार, वनसंपत्तीचा वापर आणि व्यवस्थापन व तसेच ग्रामविकास योजनांचा निर्णय घेण्यास मदत झाली आणि खाणकाम व जंगलांच्या संरक्षणासंबंधी निर्णय घेण्यासाठी आदिवासी समाजाला खूप मोठा फायदा झाला. यामुळे आदिवासींना त्यांच्या हक्कांवर स्वतःचा नियंत्रण ठेवण्याची संधी मिळाली.

**2. सांस्कृतिक आणि परंपरागत व्यवस्थांचे संरक्षण करणे :**

पेसा कायद्यामुळे आदिवासींच्या पारंपरिक न्यायव्यवस्था आणि सांस्कृतिक प्रथा अधिकृत झाल्या. ग्रामसभा आणि आदिवासींचे पारंपरिक नेते त्यांच्या समाजाच्या गरजा आणि समस्यांवर निर्णय घेऊ शकतात.

**3. जमिनीचे संरक्षण करण्यासाठी फायदा:**

पेसा कायदा जमिनीचे जबरदस्तीने हस्तांतरण थांबवतो व तसेच जमीन विक्रीसाठी स्थानिक ग्रामसभेची संमती आवश्यक आहे, ज्यामुळे आदिवासींच्या जमिनींचे संरक्षण होण्यास मदत होते.

**4. वनसंपत्तीवरील अधिकार:**

आदिवासींना त्यांच्या परंपरागत वनसंपत्तीवर हक्क मिळाला, ज्यामुळे त्यांचे उपजीविकेचे साधन मजबूत झाले आणि वनसंपत्तीच्या बाबतीत आदिवासी समाजाना अधिकार मिळाला.

**5. खाणकामावरील नियंत्रण करण्यास मोठा फायदा:**

आदिवासी समाजाना खाणकामातून होणाऱ्या उत्पन्नात स्थानिक आदिवासींना वाटा देणे व पर्यावरणीय नुकसान टाळण्यासाठी स्थानिक समुदायांच्या सहमतीची गरज याचा फायदा झाला.

**PESA कायद्यामुळे आदिवासी समाजाचा विकास :**

**1. स्थानिक निर्णय प्रक्रियेमध्ये सहभाग घेण्यास मदत:**

पेसा कायद्यामुळे आदिवासींना त्यांच्या विकासाच्या बाबतीत थेट सहभागी होण्याची संधी मिळते. गावसभेच्या माध्यमातून स्थानिक विकास योजना आखता येतात.

**2. आदिवासी समाज यांना सामाजिक न्याय आणि अधिकार याचा फायदा:**

आदिवासी महिलांना स्थानिक स्वराज्यात सक्रिय सहभागाची संधी मिळते त्यामुळे स्थानिक न्यायव्यवस्था अधिक सुलभ आणि जलद होते.

**3. आदिवासी समाजाची आर्थिक स्वायत्तता सुधारण्यास मदत:**

खनिज संपत्ती आणि जंगल उत्पादनांच्या व्यवस्थापनामुळे आदिवासी समाजाची आर्थिक उन्नती होते व तसेच गावसभेला मिळालेल्या अधिकारांमुळे स्थानिक संसाधनांचा उपयोग करून आदिवासींची उपजीविका सुधारते.

**4. आदिवासी समाजाचा शैक्षणिक आणि आरोग्य सुविधांचा विकास:**

ग्रामसभांच्या माध्यमातून शाळा, आरोग्य केंद्रे आणि इतर सुविधा सुधारण्यासाठी ठोस निर्णय घेता येतात यामुळे आदिवासी समाजाला शैक्षणिक व आरोग्य सुविधा याचा लाभ मिळण्यास फायदा होतो.

**5. जमिनीचा हक्काची सुरक्षितता:**

जमीन अधिग्रहण प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यामुळे विस्थापन रोखता येते. जमिनीवरील हक्क सुरक्षित राहतात, ज्यामुळे आदिवासींच्या आर्थिक सुरक्षिततेला चालना मिळते.

**PESA कायद्यांतर्गत खालील राज्यांचा समावेश होतो:**

पेसा कायद्यांतर्गत भारतातील एकूण 10 राज्यांचा समावेश आहे. ते खालील प्रमाणे.

महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, गुजरात, झारखंड, उडीसा, मध्य प्रदेश, छत्तीसगड, हिमाचल प्रदेश, राजस्थान, तेलंगणा इत्यादींचा समावेश आहे.

**PESA अंतर्गत येणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील जिल्ह्यांची नावे:**

पेसा अंतर्गत येणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील काही जिल्ह्यांची नावे खालील प्रमाणे आहेत:- धुळे, नाशिक, नंदुरबार, पुणे, अहमदनगर, ठाणे, पालघर, जळगाव, यवतमाळ, अमरावती, नांदेड, चंद्रपूर, गडचिरोली हे जिल्ह्ये आहेत.

**पेसा आणि नॉन पेसा क्षेत्र यातील फरक:**

पेसा अनुसूचित जमाती मधील लोकांशी संबंधित आहे. अनुसूचित विभागामध्ये रहिवासी असणाऱ्या अनुसूचित जमाती मधील लोकांसाठी पेसा क्षेत्र आहे. जे लोक अनुसूचित जमातीमध्ये मोडत नाहीत. त्या लोकांसाठी पेसा क्षेत्र कायदा लागू नाही.

**आदिवासींच्या** ज्या परंपरा, चालीरीती आहेत त्यांचे जतन करणे आणि त्यांना **स्वशासनाचे** अधिकार देणे हे **पेसा कायद्याचे** प्रमुख उद्दिष्ट आहे. यामध्ये ग्रामपंचायती अंतर्गत प्रत्येक गावाला ग्रामसभा असे संबोधण्यात आलेले आहे. ग्रामसभा घेण्याचा अधिकार आहे. ज्यांचे नाव मतदार यादीत आहे तो ग्रामसभेचा सदस्य असतो.

**संदर्भ ग्रंथ:**

1) आदिवासी साहित्य :- विविध संदर्भ – लेखक - के. पी. बेरली
2) पेसा – पंचायत उपबंध (अनुसूचित क्षेत्रो पर विस्तार ) अधिनियम 1996 – लेखक – डॉ. नितेश खाँट